# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## मेट्रो तिकीट दाखवा, सावजी फूड फेस्टिवल मध्ये सूट मिळवा!!!




नागपूर: आपल्या पाककलेच्या कौशल्यानं नागपूरचं नाव सर्व दूर पोचवणारे शेफ श्री विष्णू मनोहर यांचा तर्फे सावजी फूड डेस्टिवलचं आयोजन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स मेट्रो स्टेशन लागून असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजि निअर्सच्या इमारतीत उद्या पासून होऊ घातलेला आहे. ६ दिवस चालणाऱ्या या फेस्टिवल मध्ये एकीकडे सावजी खाद्य पदार्थांची रेलचेल असेल आहे तर दुसरीकडे मेट्रो प्रवाशांकरता हि एका प्रकारची पर्वणी ठरणार आहे. कारण मेट्रो तिकीट दाखवल्यावर प्रवाश्यांना तेथे प्रवेश शुल्कावर २५ रुपयांची सूट मिळणार आहे.

२४ ते २९ डिसेंबर दरम्यान चालणारा हा फेस्टिवल नागपूर मेट्रोच्या ऍक्वा मार्गिकेवरील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स मेट्रो स्टेशनच्या शेजारीच होणार आहे. त्यामुळे नागपूरच्या खवय्यांना या मेट्रो स्थानकापर्यंत प्रवास करायचा आहे. त्यामुळे रंजक सावजी पदार्थांचा आस्वाद आता कमी खर्चात होणार आहे.